**प्रसिद्धीसाठी**

**१६/०२/२०२२**

# श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाचा ७१ वा वार्षिक दीक्षांत समारंभ

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाचा ७१ वा वार्षिक दीक्षांत समारंभ दिनांक २५ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी ११ वाजता सर सीताराम आणि लेडी शांताबाई पाटकर दीक्षांत सभागृह (पाटकर हॉल) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, १, नाथीबाई ठाकरसी मार्ग, चर्चगेट, मुंबई – ४०० ०२० येथे आयोजित करण्यात आला आहे.

७१ व्या वार्षिक दीक्षांत समारंभामध्ये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विद्यापीठाचे विविध अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या विद्यार्थिनींना पदवी आणि पदविका प्रदान करण्यात येतील. या दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान राज्याचे महामहिम राज्यपाल तथा कुलपती श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, श्री. भगतसिंह कोश्यारी भूषवणार आहेत तर या समारंभास प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. श्री. उदय सामंत उपस्थित राहणार आहेत. दीक्षांत समारंभाचे अभिभाषण राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा.श्री. उदय सामंत करतील तर दीक्षांत समारंभाचे स्वागतपर भाषण व विद्यापीठाचा दीक्षांत अहवाल श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या मा.कुलगुरू प्रा. उज्वला चक्रदेव सादर करतील. ७१ वा दीक्षांत समारंभ यशस्वी करण्यासाठी विद्यापीठाच्या मा. प्र. कुलगुरू प्रा. रुबी ओझा आणि डॉ. सुभाष वाघमारे, कुलसचिव (अति. कार्यभार) यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

राज्यामध्ये निर्धारित असलेल्या व राज्यशासना मार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या कोव्हीड प्रतिबंधक सूचना, मार्गदर्शक तत्वे आणि कोव्हीड अनुरूप वर्तन बाबींचा विचार करता विद्यापीठाच्या ७१ व्या वार्षिक दीक्षांत समारंभास फक्त बक्षीसपात्र व विद्यावाचस्पती (पीएच. डी.) विद्यार्थीनींनी दीक्षांत समारंभाच्या संचलन (procession) सरावासाठी निर्धारित वेशभूषेत दिनांक २५ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी ८.३० वाजता विद्यापीठाच्या चर्चगेट स्थित प्रांगणात उपस्थित राहणे अनिवार्य आहे. राज्यातील कोव्हिड परिस्थिती लक्षात घेता समारंभास अनुपस्थित इतर विद्यार्थिनींसाठी दीक्षांत समारंभाच्या थेट वेबकास्टची लिंक विद्यापीठाच्या www.sndt.ac.in या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

सदर दीक्षांत समारंभामध्ये १४५४८ विद्यार्थिनींना श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या १८१ विषयातील पदवी आणि पदविका प्रदान करण्यात येतील. तसेच परीक्षेमध्ये अव्वल स्थान प्राप्त केलेल्या ७४ विद्यार्थिनींना सुवर्ण पदक, २ विद्यार्थिनींना रजत पदक व १४५ विद्यार्थिनींना रोख पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे अशी माहिती डॉ. संजय शेडमाके, संचालक (अति. कार्यभार), परीक्षा व मूल्यमापन मंडळ, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ यांनी दिली आहे.

**SNDT Women's University**
Shreemati Nathibai Damodar Thackersey Women's University
Reaccredited by NAAC, Awarded "A" Grade

